जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने महाराष्ट्र शासन व विविध उद्योग व्यावसायिक संस्था यांच्या समवेत ९ सामंजस्य करारावर कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या उपस्थितीत आज दि. २७ जून रोजी स्वाक्षरी केल्या तसेच बीकॉम रिटेल मॅनेजमेंट, बीएससी अप्लाइड बायोलॉजी, बीए ह्युमेनिटीज अँड सिव्हिल सर्व्हिसेस या तीन अप्रेटिंसशिप एम्बेडेड डीग्री प्रोग्राम सोबत एम.ए. ट्रायबल अॅकेडमी पी.जी. डिप्लोमा इन मॅनेजमेंट प्रोग्रॅमच्या माहितीपत्रकाचे प्रकाशन करुन या अभ्यासक्रमाच्या प्रारंभाची घोषणा करण्यात आली.

यावेळी या समारंभाचेअध्यक्ष विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेचे अध्यक्ष श्री. अशोक जैन, प्रमुख अतिथी विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा.डॉ.आर.एस.माळी, प्रा.डॉ.के.बी.पाटील, अॅप्रेंटेशिप अॅम्बडेड डिग्री प्रोग्राम (AEDP) कार्यगट महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. भरत अमळकर, प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे व कुलसचिव डॉ. विनोद पाटील मंचावर उपस्थित होते.

यावेळी कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी सांगितले की, स्थानिक विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्यासाठी अप्रेंटिस एम्बेडेड डिग्री प्रोग्रामच्या माध्यमातून संधी निर्माण झाली आहे. शिकतांनाच त्यांना विद्यावेतनही मिळणार असून इच्छित क्षेत्रात त्यांना काम करण्याची संधी निर्माण होणार आहे. महाराष्ट्र शासन व उद्योग व्यावसायिकांनी भरभरुन प्रतिसाद देऊन सहकार्याबददल आभार मानले.

माजी कुलगुरु प्रा. आर.एस.माळी यांनी उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढले पाहिजे त्याकरीता देशात विद्यापीठांची संख्या वाढली पाहिजे. अप्रेंटिस एम्बेडेड डिग्री प्रोग्राम व्दारा राबविले जाणाऱ्या विविध अभ्यासक्रमांमुळे निश्चितच उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विद्यापीठाच्या या पुढाकाराचे त्यांनी कौतुक केले.

माजी कुलगुरु प्रा. के.बी. पाटील यांनी सांगितले की, विद्यापीठांमधून नाविन्यपूर्ण संशोधन होणे आवश्यक आहे. त्याकरीता पुरेसे नियमित अध्यापक विद्यापीठात असावे. बदलत्या काळाप्रमाणे शिक्षण बदलत चालले आहे. अप्रेंटिस एम्बेडेड डिग्री प्रोग्रामच्या या तीन नविन अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना चांगली संधी आहे. विद्यापीठाचे धोरण चांगले असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. भरत अमळकर यांनी सांगितले की, युवकांची संख्या वाढत आहे त्यानुसार वाढती बेरोजगारी कमी करण्यासाठी नव्या शैक्षणिक धोरण उपयुक्त ठरेल. त्याचाच एक भाग म्हणून अप्रेंटिस एम्बेडेड डिग्री प्रोग्रामच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमांची निर्मिती होऊन विद्यार्थ्यांना शिकतांनाच विद्यावेतन मिळेल व भविष्यात नोकरीची संधी देखील निर्माण होईल. नव्या शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचे शिक्षण मिळेल व त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात काम करण्याची संधी प्राप्त होणार आहे. कबचौउमविने कमी कालावधीत हे अभ्यासक्रम तयार करुन व त्याची सुरुवात करुन राज्यात उल्लेखनीय योगदान दिले आहे.

उद्योजक अनिल कांकरीया यांनी रिटेल क्षेत्रात मोठी संधी आहे मात्र त्याकरीता कुशल मनुष्यबळ मिळत नव्हते. विद्यापीठोन उद्योगांसमवते चर्चा करुन तयार केलेल्या या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून प्रशिक्षीत मुनष्यबळ प्राप्त होईल असे सांगितले. जळगाव पिपल्स बँकेचे अध्यक्ष अनिकेत पाटील यांनी हे अभ्यासक्रम संस्था व विद्यार्थी दोघांनाही फायद्याचे असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय समारोप करतांना श्री. अशोक जैन यांनी सांगितले की, विद्यापीठाने केवळ तीन महिन्यांपूर्वी जळगाव, धुळे व नंदुरबार या तिन्ही जिल्ह्यातील उद्योगांसमवेत अप्रेंटिस एम्बेडेड डिग्री प्रोग्राम अंतर्गत अभ्यासक्रमाबाबत संवाद साधला होता आणि आज त्यामधून तीन अभ्यासक्रम तयार करुन त्यांना प्रारंभ होत आहे अत्यंत कमी कालावधीत होत असलेली ही अंमलबजावणी अतिशय कौतुकास्पद असल्याचे नमूद केले. तसेच केळी व्यवसायातून कोटयावधी रुपयांच्या माल विदेशात जातो. टिश्यू कल्चर व केळीची शेतीवर आधारित विद्यापीठाने

अभ्यासक्रम तयार करता येईल का याबाबतचा प्रस्ताव मांडला. विद्यापीठाने असा अभ्यासक्रम तयार केला तर शेतकरी व विद्यार्थी यांन याचा मोठयाप्रमाणावर फायदा होईल. याकरीता जैन उद्योग समुह पूर्ण सहकार्य करेल अशी हमी त्यांनी यावेळी दिली.

प्रारंभी प्रातिनिधीक स्वरुपात करारावर विद्यापीठाकडून कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी व प्रोग्रेसिव ग्रोसर्स (नवजीवन प्लस सुपर शॉप)चे संचालक अनील कांकरीया यांनी स्वाक्षरी केल्या. त्यानंतर करार हस्तांतरण करण्यात आले. करार हस्तांतरणासाठी जिल्हाधिकारी कार्यालय जळगावच्या वतीने उपजिल्हाधिकारी अर्चना मोरे, जळगाव पीपल्स को ऑपरेटिव्ह बँक ली. च्यावतीने अध्यक्ष अनिकेत पाटील, जळगाव जनता बँकचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय नागमोती, जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.कडून श्री.भट व डॉ.के.बी.पाटील, नॅचरुली युवर्स बायोटेक तर्फे संचालक निलेश तेली, दीपक मेडिकल अमळनेरचे दीपक पाटील, बोर्ड ऑफ अॅप्रेंटीसशीप ट्रेनिंग, मुंबई कडून प्रदीप थेंगडे व बी आय ए एफच्या पूनम पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवसंशोधन, नवोपक्रम व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. राजेश जवळेकर यांनी तर आभार कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी मानले. यावेळी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य, विद्या परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, उद्योग व्यावसायिक, शिक्षक व अधिकारी उपस्थित होते.

---------------------------------------------------------------------------------

प्रति

मा.संपादक

कृपया वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातूनप्रसिध्दीस द्यावी ही विनंती

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने आयोजित जिमखाना डे या कार्यक्रमास केंद्रीय राज्य व युवक कल्याण क्रीडामंत्री श्रीमती. रक्षा खडसे उपस्थित राहणार असून अध्यक्ष स्थानी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी असणार आहेत.

विद्यापीठात सोमवार दि. ३० जून रोजी सकाळी १० वाजता अधिसभा गृहात जिमखाना डे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षात उत्कृष्ट कामगिरी करणारे खेळाडूंचा गौरव या कार्यक्रमात केला जाणार आहे. तसेच दक्षिण पश्चिम विभागीय, अखिल भारतीय, आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा, खेलो इंडिया आंतर विद्यापीठ स्पर्धा व क्रीडा महोत्सव स्पर्धा तसेच भारतीय विद्यापीठ संघात निवड झालेल्या क्रीडा स्पर्धेमध्ये सुवर्णपदक, रौप्य पदक, कांस्य पदक प्राप्त खेळाडूंचा आणि नुकत्याच जाहीर झालेल्या शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडूंचा सत्कार केला जाणार आहे. या कार्यक्रमास प्र.कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, तसेच व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, वि. प. सदस्य, प्राचार्य उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील यांनी दिली.

**बातमी क्र. २**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे दिनांक ३० जून २०२५ पासून विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहे.

यात भारतीय आणि विदेशी भाषा जसे, फ्रेंच, जर्मन, जपानी, जर्मन भाषा A1 आणि A2 स्तर, संस्कृत, मोडीलिपी या शिक्षणक्रमांसोबत सायबर गुन्हे आणि कायदे, मानसशास्त्रीय कसोट्या आणि मोजमाप, लिंग संवेदनशीलता, ज्येष्ठ नागरिक सहाय्यता दूत, कवयित्री बहिणाबाई : जीवन व काव्य, तथागत भगवान बुद्ध आणि त्यांचे तत्त्वज्ञान आदी शिक्षणक्रमांचा समावेश आहे.

विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे मातत्याने रोजगाराभिमुख नवनवीन उपक्रम राबवले जातात. विद्यार्थ्यांना नोकरी व्यवसाय करून शिक्षणाची संधी विभागाद्वारे उपलब्ध करून दिली जाते. गेल्या काही वर्षांपासून विविध भाषेतील तज्ज्ञांची गरज अधिक प्रमाणात वाढत असल्याने एकापेक्षा अनेक भाषांचे ज्ञान असणाऱ्या विद्यार्थ्यांना जागतिक स्तरापर्यंतच्या रोजगाराच्या संधी मिळू शकतात. या हेतूने कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली आजीवन विभागाद्वारे विद्यार्थी अधिक कौशल्याधीष्ठीत होण्यासाठी घरी बसल्या बसल्या ऑनलाईन पद्धतीने विविध प्रमाणपत्र शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठीची संधी उपलब्ध करून दिली आहे.

ऑनलाईन पद्धतीने प्रमाणपत्र शिक्षणक्रम पूर्ण करण्याची सुविधा, विषय तज्ज्ञ आणि अनुभवी मार्गदर्शकांद्वारे मार्गदर्शनाची संधी, आठवड्यातून दोन दिवस ऑनलाईन वर्ग सुविधा (काही शिक्षणक्रमात प्रात्यक्षिक कार्यसाठी विद्यापीठात यावे लागते) शिक्षणक्रमअंतर्गत कार्य यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतरच विद्यापीठाकडून अधिकृत प्रमाणपत्र मिळणार असल्याची या शिक्षणक्रमांची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन विद्यापीठाच्या आजीवन विभागाद्वारे करण्यात आले आहे.

ऑनलाईन प्रवेश लिंक आणि अधिक माहितीसाठी खालील संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. https://nmu.ac.in/external-education/en-us/Programmes/Certificate-Program तसेच अधिक माहितीसाठी या क्रमांकावर संपर्क करावा - ०२५७-२२५७४९५,२२५८४९६.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेत डिप्लोमा इन जर्नालिझम, बी.ए.एम.सी.जे. , एम.ए.एम.सी.जे. (जनसंवाद आणि पत्रकारिता) या अभ्यासक्रमांसह

डिजिटल आणि सोशल मीडिया, कॅमेरा हॅन्डलिंग, व्हिडिओ एडिटींग, रेडिओ जॉकी, रायटींग फॉर न्यूजपेपर, न्यूजपेपर पेजिनेशन,जनसंपर्क या तीन महिन्यांच्या कौशल्यआधारित व रोजगारभिमुख सात प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बी.ए.एमसीजे (जनसंवाद आणि पत्रकारिता) हा बारावीनंतर चार वर्षीय अभ्यासक्रम यावर्षीपासून विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेत सुरु करण्यात आला आहे. बी.ए. एमसीजे (जनसंवाद आणि पत्रकारिता) आणि ‍िडप्लोमा इन जर्नालिझमङ ला प्रवेश घेण्यासाठी इयत्ता बारावीत किमान 40 टक्क्यांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच पदवी (अॅनी ग्रॅज्युएशन) नंतर एम.ए.एम.सी.जे. (जनसंवाद आणि पत्रकारिता) हा दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम असून या अभ्यासक्रमाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे.

नोकरी, व्यवसाय, उद्योग सांभाळून करता येणार तीन महिन्याचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम डिजिटल आणि सोशल मीडिया, रेडिओ जॉकी, रायटींग फॉर न्यूजपेपर, जनसंपर्क हे चार प्रमाणपत्र अभ्यासक्रम ऑनलाईन तर कॅमेरा हॅन्डलिंग, व्हिडिओ एडिटींग, न्यूजपेपर पेजिनेशन हे तीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम ऑफलाईन असणार आहेत.या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता बारावी किमान ४० टक्यांसह उत्तीर्ण असणे आवश्यक असून हे अभ्यासक्रम तीन महिन्याच्या मुदतीचे आहेत. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या तासिका फक्त रविवारी होणार आहेत. त्यामुळे नोकरी, व्यवसाय, उद्योग सांभाळून हे अभ्यासक्रम पूर्ण करता येतील.

रोजगाराच्या संधी उपलब्ध वरील अभ्यासक्रम पूर्णत: रोजगारभिमुख असून यशस्वी विद्याथ्र्यांना वृत्तपत्रे, रेडिओ, वृत्तवाहिन्या, ऑनलाईन पत्रकारिता, सोशल मिडिया, जाहिरात संस्था आदी ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध आहे. तसेच शासकीय किंवा खाजगी क्षेत्रात जनसंपर्क अधिकारी, संवाद तज्ज्ञ, सोशल मिडिया हॅंडलर म्हणून कार्य करण्याची देखील संधी उपलब्ध आहे.

प्रवेशाकरीता विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर भेट देवून https://nmuj.digitaluniversity.ac या ऑनलाईन अॅडमिशन लिंकला क्लिक करून प्रवेशासंबंधी अर्ज करणे आवश्यक आहे. तरी इच्छूक विद्याथ्र्यांनी प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर (8407922404), डॉ.गोपी सोरडे (9834166072) अथवा प्रशाळेत कार्यालयीन वेळेत 0257-2257436, 2257438 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर यांनी केले आहे.

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २८ जून, २०२५

प्रति

मा.संपादक

कृपया वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातूनप्रसिध्दीस द्यावी ही विनंती

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता